## आतील पानात वाचा

- मित्रांची संगत म्हणजे जीवनात रंगत
- पारनेरमध्ये निर्भया पथक स्थापन करण्याची मागणी...
- जिंतूर तहसील कार्यालय परिसर जलमय! नागरिकांची मोठी गैरसोय...



दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०५ | अंक : ३५२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०२ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# मराठवाड्यात अतिवृष्टी, कयाधू नदीला पूर, ६ गावांचा संपर्क तुटला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, छ. संभाजीनगर :** मराठवाड्यात सलग दुसऱ्या दिवशीही जोरदार पाऊस झाला आहे. गेल्या २४ तासात विभागात ६७.१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. हिंगोली जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस झाला असून कयाधू नदीला आलेल्या पुरामुळे सहा गावांचा संपर्क तुटला आहे. विभागात तब्बल २३३ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

मराठवाड्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. विभागात शुक्रवारी दिवसभर दमदार पाऊस झाला. पावसामुळे बहुतांश जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले आहे. यावर्षी पहिल्यांदाच मोठा पाऊस झाला आहे. नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यात पावसाचा जोर आहे. किनवट तालुक्यात नदी-नाल्यांना पूर आला आहे. काही गावांमध्ये पाणी शिरल्यामुळे घरांचे नुकसान झाले आहे.

माहूर तालुक्यात सर्वाधिक पाऊस झाला आहे. मांडवा या महसूल मंडळात तब्बल २३९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. गेल्या २४ तासांत म्हणजेच शुक्रवारी सकाळी साडेआठपर्यंत मराठवाड्यात सरासरी ६७.१ मिलिमीटर पाऊस झाला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ६०.३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जालना ८४, बीड ४३.९, लातूर ४५.२, धाराशिव ३५.७, नांदेड ८८.६, परभणी ८९.२ आणि हिंगोली जिल्ह्यात सर्वाधिक १०९.१ मिमी पाऊस झाला आहे, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

यंदा पावसाने अपेक्षित सरासरी गाठली आहे. आतापर्यंत ३२० मिमी पाऊस होणे अपेक्षित असताना आतापर्यंत ३२५ मिमी पाऊस झाला आहे. विभागात १०१.५ टक्के पाऊस झाला आहे. हिंगोली जिल्ह्यात गुरुवारी रात्री झालेल्या पावसामुळे नुकसान झाले आहे. कयाधू नदीला मोठा पूर आला असून सोडेगाव पुलापर्यंत पाणी पोहचले आहे. त्यामुळे दोन्ही बाजुचा संपर्क तुटला आहे.



कळमनुरी तालुक्यातील कान्हेगाव, चिखली, पिंपरी, सोडेगाव, नंदापूर, कसबेधावंडा या सहा गावांचा संपर्क तुटला आहे, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे. मात्र, पुरामध्ये कुणीही अडकले नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सिल्लोड तालुक्यातील केळगाव, आधारवाडी, केऱ्हाळा या गावात झालेल्या पावसामुळे केळगावकडे जाणाऱ्या पुलावरुन पाहणी वाहत आहे. त्यामुळे तिनही गावांचा संपर्क तुटलेला आहे. सर्व जिल्ह्यात पावसाने हजेरी लावल्यानंतर नदी-नाले दुथडी भरुन वाहत आहेत. त्यामुळे लघु आणि मध्यम प्रकल्पात पाण्याची आवक वाढण्यास सुरुवात झाली आहे. जायकवाडी धरणात आवक कायम असून ७४ टक्के पाणीसाठा झाला आहे.

**माहूर तालुक्यात धुव्वाधार**

मराठवाड्यात गुरुवारी झालेल्या दमदार पावसामुळे २३३ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. मांडवा (जि. नांदेड) या मंडळात सर्वाधिक २३९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. नांदेड जिल्ह्यातील माहूर (२३३), वाई (१९४.५०), सिंदखेड (१९४), वानोळा (१४१ मिमी) पाऊस झाला आहे. हिंगोली जिल्ह्यातील सिरसम (१७३.५ मिमी), नरसी (१५७), गोरेगाव (१५१ मिमी) पाऊस झाला आहे. पुढील दोन दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे.

## मुख्यमंत्री डी.के.शिवकुमार, मुख्यमंत्री फडणवीस राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या ११ व्या महाअधिवेशनाचे उद्घाटन करणार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे ११ वे अधिवेशन बेंगलोर येथे ७ ऑगस्ट २०२६ रोजी ज्ञानज्योती ऑडिटोरियम डॉ मनमोहन सिंग सिटी युनिव्हर्सिटी बेंगळुरू येथे होत आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून सिद्धारामया माजी मुख्यमंत्री, कर्नाटका, डॉ. जी. परामेश्वरा उपमुख्यमंत्री कर्नाटक, काँग्रेस कमिटी चे प्रदेशाध्यक्ष आमदार बी. के. हरिप्रसाद , प्रदेशाध्यक्ष काँग्रेस कमिटी तेलंगणाचे बोम्मा महेशकुमार गौड, एच. डी. कुमारस्वामी केंद्रीयमंत्री, महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे महाराष्ट्र, ओबीसी मंत्री अतुल सावे महाराष्ट्र, याचीन्द्रा सिद्धारामया नगर विकास मंत्री, पोन्नाम प्रभाकर गारु, ओबीसी कल्याण मंत्री, कर्नाटका राज्य, कोंडा सुरेखा गारु पर्यावरण, वन मंत्री, तेलंगाना राज्य, वकाती श्रीहरी गारु, क्रीडा, युवा सेवा मंत्री, तेलंगाना, यु. टी. कादेर आरोग्य कुटुंब कल्याण मंत्री, कर्नाटक राज्य, रामलिंग रेड्डी सिंचन मंत्री, कर्नाटक राज्य, प्रतिभा धानोरकर खासदार, महाराष्ट्र, वडीराजू रविचन्द्रा खासदार, तेलंगाना, डॉ. परिणय फुके आमदार महाराष्ट्र, अभिजित वंजारी आमदार, महाराष्ट्र, सुधाकर अडबाले आमदार महाराष्ट्र, संजय देरकर आमदार महाराष्ट्र, आशिष देशमुख आमदार महाराष्ट्र राज्य, हनुमंतराव माजी खासदार, तेलंगाना, ईटेला राजेंदर गारु माजी मंत्री, तेलंगाना, मधु बंगारप्पा आमदार कर्नाटक, आर. अशोका विरोधी पक्ष नेता, कर्नाटक, एस. मधुसुदम चारी गारु विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते, तेलंगाना, जी. सी. चंद्रशेखर राज्यसभा सदस्य, यदुवीर के. चामारजा वाडियार सांसद, कर्नाटक, सुरेश कुमार शेरकर सांसद, तेलंगाना, बी.वाय. विजयेंद्र आमदार, कर्नाटक, वीस्लापाल्ली शंकर गारु आमदार, कर्नाटक, एन. ए. हॅरिस आमदार, कर्नाटक, नेलीक्रांती सत्यम गारु विधान परिषद सदस्य, कर्नाटक, रघु कौटिल्य विधान परिषद सदस्य, कर्नाटक, डॉ. सी.एन. अश्वार्थ नारायण माजी उपमुख्यमंत्री आणि उच्च शिक्षण मंत्री कर्नाटक, महादेव जानकर माजी मंत्री महाराष्ट्र, डी. टी. श्रीनिवास मागासवर्गीय आयोग अध्यक्ष, कर्नाटक, वी. श्रीनिवास गौड गारु माजी मंत्री, तेलंगाना र, गांगुला कमलाकर गारु माजी मंत्री, तेलंगाना, बिर्ला हैः आमदार, तेलंगाना, अधी श्रीनिवास गारु आमदार, तेलंगाना, मधु यास्की गौड गारु माजी खासदार, तेलंगाना, हे निमंत्रित आहेत. पहिल्या सत्राचे अध्यक्ष प्रा. शेषराव येलेकर तर दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष जाजुला श्रीनिवास राहणार आहेत.




महासंघ दरवर्षी केंद्र व राज्य सरकारकडे विविध मागण्यांसाठी ७ ऑगस्टला अधिवेशन आयोजित करत असते. केंद्र सरकारने ओबीसींची जातनिहाय जनगणना करावी, आणि २०२७ जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र कॉलम ठेवण्यात यावा, आरक्षणाची मर्यादा ५० टक्के वरून हटवण्यात यावी व लोकसंखेच्या प्रमाणात आरक्षण देण्यात यावे, ओबीसी लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी, केंद्रात स्वतंत्र ओबीसी मंत्रालयाची स्थापना करण्यात यावे, ४ मार्च २०२१ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रद्द करण्यात आलेले ओबीसीचे स्थानिक स्वराज्य संस्था मधील राजकीय आरक्षण पूर्ववत सुरू करण्याकरिता संविधानाच्या कलम २४३ डी (६) व कलम २४३ टी (६) मध्ये सुधारणा करण्यात यावी, देशातील ओबीसींना लोकसंखेच्या प्रमाणात २७ टक्के राजकीय आरक्षण लागू करण्यात यावे, १३ सप्टेंबर २०१७ पासून क्रिमिलेअरची मर्यादा वाढलेली नाही, ओबीसी समाजाला लावण्यात आलेली क्रिमिलेअरची घटनाबाह्य अट त्वरित रद्द करण्यात यावी व ती रद्द होईपर्यंत मर्यादा २० लाख करण्यात यावी, महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार बहाल करण्यात यावा, ओबीसी प्रवर्गातील शेतकरी आणि शेतमजुरांना वयाच्या ६० वर्षानंतर पेशन योजना करण्यात यावी तसेच बेंगलोर येथील अधिवेशनात २६ प्रलंबित मागण्याचा सुद्धा ठराव घेण्यात येईल., यासह विविध प्रलंबित मागण्या या अधिवेशनात करण्यात ठराव घेण्यात येतील. अधिवेशनाला ओबीसी बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, महासचिव सचिन राजुरकर, प्रा शेषराव येलेकर, किरण पांडव, शरद वानखेडे, राजकुमारगिरी गोसावी, गुणेश्वर आरीकर, दिनेश चोखारे, प्रकाश साबळे, रत्नमाला पिसे, सुभाष घाटे, डॉ. विनोद चौधरी, डॉ. प्रकाश भागरथ, ज्योतीताई ढोकणे, सुरज बेलोकर, यांनी आवाहन केले आहे.

## वर्धा नदीच्या पुराने शेतशिवार जलमय !

### शेतपिकांच्या नुकसानीमुळे बळीराजा हवालदिल

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यात मागील तीन दिवसात जोरदार पर्जन्यमान झाले. सर्वत्र पावसाच्या जोरधारा बरसल्याने नदी व नाल्यांना पूर आला. वर्धा नदीने धोक्याची पातळी ओलांडली. परिणामी बल्लारपूर तालुक्यातील विसापूर, नांदगाव( पोडे ), हडस्ती, चारवट येथील शेतशिवार वर्धा नदीच्या पुराने जलमय झाले. यामुळे शेतपिकांचे मोठे नुकसान झाल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे.

बल्लारपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामात कापूस, सोयाबीन, भात, भाजीपाला व कडधान्य पिकांची मशागत करून लागवड केली. यावर्षी पाऊस कमी होणार, म्हणून हवामान विभागाने अंदाज वर्तवला. मात्र निसर्ग सात देणार, या आशेवर शेतकऱ्यांनी पेरणी केली. मध्यंतरी बळीराजाने पावसासाठी लोकप्रथेनुसार आर्जव केली. पाऊस चांगला झाला. मात्र वर्धा नदीच्या पुराने शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फेरले. यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

शुक्रवार पासून बल्लारपूर - विसापूर, नांदगाव( पोडे ) - विसापूर आणि माना - चारवट मार्ग वर्धा नदीच्या पुराने बंद झाले. शनिवारी पावसाने काही प्रमाणात उसंत घेतली. मात्र अधूनमधून सरी बरसत होत्या. पुराचा जलस्तर वाढत होता. यामुळे शेतातील पिकांची नासाडी होण्याची शक्यता आहे. असेच चित्र बल्लारपूर, बामणी ( दुधोली ), दहेली,लावारी, कळमना, पळसगाव, आमडी, कोठारी, काटवली बामणी, किन्ही आदी भागातील शेतकऱ्यांचे आहे.

## पाटण पोलीस मैदानावर, सुदाम पाचोरकर, यांच्या हस्ते वृक्षारोपण संपन्न

**अक्षराज : सुरेश संकपाळ**



**दि.०१, पाटण :** पाटण पोलीस म्हटले की कडक शिस्त, गुन्हेगारीवर जरब आणि कायदा व सुव्यवस्था पण याच खाकी वर्दीच्या आत एक हळवा, निसर्गावर प्रेम करणारा दिलदार माणूसही दडलेला असतो, हे पाटण पोलिसांनी पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.पाटण पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस मैदानावर शुक्रवार दिनांक ३१ रोजी दुपारी १२.०० वाजता एक आगळा-वेगळा आणि स्तुत्य वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे पाटणचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक, निलेश तारू, यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तर या संपूर्ण उपक्रमाला पाटण उपविभागाचे कडक शिस्तीचे पण पर्यावरणप्रेमी उपविभागीय पोलीस अधिकारी सुदाम पाचोरकर यांचे अनमोल मार्गदर्शन व प्रमुख उपस्थिती लाभली पाटण पोलीस ठाणे परिसरात मोठी मोकळी जागा आहे. या जागेचा सुंदर वापर करीत तेथे विविध देशी, प्रजातींची झाडे लावण्यात आली. केवळ झाडे लावून न थांबता, ती जगवण्याची, त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारीही पाटण पोलिसांनी घेतली आहे.यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना डीवायएसपी,सुदाम पाचोरकर, व पाटण पोलीस निरीक्षक निलेश तारू म्हणाले, वृक्षांवर प्रेम करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. वृक्षामुळेच आपल्याला शुद्ध ऑक्सिजन मिळतो, कडक उन्हात थंड सावली मिळते आणि निसर्गाचा समतोल राखला जातो. वृक्षांचे अनंत फायदे आपल्याला होत असतात. आज लावलेले एक रोप उद्या मोठा वटवृक्ष होऊन शेकडो लोकांना प्राणवायू देईल. प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन केले पाहिजे.

पाटण पोलीस ठाणे परिसर लवकरच हिरवाईने नटणार असून हा परिसर अधिक सुंदर आणि प्रसन्न होणार आहे.

पोलिसांच्या या हिरव्या उपक्रमाचे संपूर्ण पाटण तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. यावेळी पाटण पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष कर्मचारी संजय राऊत, वैभव पुजारी, संतोष माने, शरद गुरव, हणमंत नलावडे, आशिष कांबळे व इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## तापी नदीच्या महापुरामुळे त-हाडी येथील शेतीचे अतोनात नुकसान

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०१, शिरपूर :** गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार अतिवृष्टीमुळे आणि तापी नदीला आलेल्या उग्र महापुरामुळे शिरपूर तालुक्यातील त-हाडी येथील शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. पुराचे पाणी थेट शेतात शिरल्यामुळे पिकांची नासाडी झाली असून, प्रशासनाने तातडीने प्रत्यक्ष जागेवर येऊन पंचनामे करावेत आणि पीडित शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी स्थानिक ग्रामस्थ विशाल बालू करंके यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार साहेबांकडे केली आहे.



**हाता तोंडाशी आलेला घास हिरावला...**

तापी नदीच्या रौद्ररुपाने त-हाडी शिवारातील कापूस, सोयाबीन, केळी आणि ऊस यांसारखी उभी पिके पूर्णपणे पाण्याखाली गेली आहेत. पूर एवढा भयंकर होता की अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीतील सुपीक माती वाहून गेली असून, काहींच्या विहिरी आणि शेतीचे साहित्यही उद्ध्वस्त झाले आहे. यामुळे बळीराजाचे अतोनात नुकसान झाले असून शेतकऱ्यांचा हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.

> अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतकरी पूर्णपणे खचून गेला आहे. प्रशासनाने या संवेदनशील विषयावर गांभीर्याने लक्ष देऊन त-हाडीतील गरीब व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने न्याय मिळवून द्यावा.
>
> **-विशाल करंके**
> **(ग्रामस्थ, त-हाडी)**

**निवेदनातील प्रमुख मागण्या:**

**तातडीने पंचनामे :** पुरामुळे बाधित झालेल्या सर्व शेतजमिनींचे आणि नष्ट झालेल्या पिकांचे महसूल व कृषी विभागामार्फत तातडीने पंचनामे करण्यात यावेत.

**पारदर्शक नोंदणी :** कोणतीही हलगर्जी न करता प्रत्येक लहान-मोठ्या नुकसानग्रस्त शेतकऱ्याची अचूक नोंद घेण्यात यावी.

**आर्थिक मदत :** आधीच कर्जबाजारी असलेल्या बळीराजाला या संकटातून सावरण्यासाठी शासनाकडून तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई मंजूर करण्यात यावी.




## सुंदर नाते मैत्रीचे

मैत्री पाहायला गेलं तर अगदी दोन अक्षरी शब्द पण या दोन अक्षरी शब्दात जगातील सर्वात पवित्र अशी भावना लपली आहे. जगातील सर्वात सुंदर नातं कोणतं असेल तर ते मैत्रीचं नातं, कारण या नात्यात कोणताही स्वार्थ नसतो. मैत्री कधीही ठरवून होत नाही. मैत्री कशी, कधी, कोणाशी होईल हे कोणीच सांगू शकत नाही. मैत्रीला काळाची, वेळेची, वयाची बंधने नसतात. मैत्रीत जात, धर्म, वर्ण, लिंग असा कोणताही भेदभाव नसतो. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत कोणाशीही मैत्री होऊ शकते. समान छंद, समान आवडी, समान विचारधारा आणि परस्परांचे स्वभाव जुळले की मैत्री जमते. रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते महत्वाचे आहे. जगात मित्र नाही असा कोणताच व्यक्ती नाही. भारतात तर पौराणिक काळापासून मैत्रीला महत्व आहे. श्रीकृष्ण सुदामा यांची तर मैत्री अजरामर आहे. काळ बदलला तरी मैत्रितील पवित्र भावना आजही तीच आहे. मैत्री ही प्रामाणिक आणि तरळ भावना आहे. मित्रा समोरच आपण आपलं मन मोकळं करू शकतो. मानवी जीवनात क्षणाक्षणाला काहीना काही घडत असते. काही चांगले काही वाईट घडत असते. या बऱ्या वाईट घटनांच्या अपरिहार्यतेचा विचार करता मैत्री आणि मित्र आवश्यक असतातच. मंदिरातील देवासमोर जसे आपण आपले मन मोकळे करतो तसेच आपण आपल्या खऱ्या मित्रा जवळही आपले मन मोकळे करतो. आजकाल मैत्रीतही हिशोबीपणा आला आहे. मैत्रीतही स्वार्थ आला आहे. त्यामुळे मैत्रिची पवित्र भावना काळवंडू लागली आहे. स्वार्थाच्या अंधारात मैत्री चाचपडू लागली आहे त्यामुळे मैत्रीतून मिळणारा आनंदही कमी होऊ लागला आहे. स्वार्थी मित्र आपण सहज ओळखू शकतो. स्वतःच्या स्वार्थासाठी जवळ येणारे मित्र आपल्याला संकटकाळात मदत करत नाहीत. जो आपल्याला संकटकाळात मदत करतो तोच खरा मित्र असतो. जीवनाच्या प्रवासात अनेक मित्र भेटतात, निघून जातात पण मनाने जुळलेले मित्र मात्र कायम राहतात. मित्रांमुळे आपल्याला व्यवहार कळतो. अडचणी सुटतात, संकटावर मात करण्याचे धाडस निर्माण होते. मैत्रीमुळे आपली निर्णय क्षमता वाढते. इतकेच काय तर मैत्रीमुळेच माणूसकी जिवंत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. केवळ सहवास म्हणजे मैत्री नव्हे, सहवास आणि मैत्री यात फरक आहे. सहवासाने मैत्री फुलत जाते हे जरी खरे असले तरी मैत्रीसाठी मित्र दररोज जवळ असावाच असे काही नाही. अनेकदा जिवलग मित्र जवळ नसतात. कित्येक दिवस त्यांच्यात बातचीत होत नाही तरीही त्यांची मैत्री कायम असते अगदी श्रीकृष्ण सुदाम्या सारखी. पु .ल. देशपांडे यांनी मैत्री विषयी एक फार सुंदर कविता लिहिली आहे. ते लिहितात

रोज आठवण व्हावी असे काही नाही.

इतकंच काय रोज बोलणं व्हावं असंही काही नाही. पण मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री आणि तुला याची जाणीव असणे ही झाली मैत्री.

अशी सरळ सोपी पण घट्ट मैत्री टिकवणं, निर्माण करणं फार कठीण नाही आणि फार सोपंही नाही. मनाचा एवढा हळवेपणा नवरा बायकोच्या नात्यामध्ये नाही हो येत, तिथे मित्रच असावा लागतो. कारण इतर कोणत्याही नात्याला आपण नाव दिले की, त्याबरोबर कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आणि शारीरिक बंधने येतात. या नात्याला मात्र कसले नाव नाही त्यामुळे कसली बंधनंही नाहीत किंबहुना ती तशी नसावीतही. मित्रांशी वाट्टेल त्या विषयावर आपण गप्पा मारू शकतो, मोकळे होऊ शकतो, तिथे स्त्री – पुरुष, जात – पात, वय काही आडवे येत नाही. मनसुबा बनून जातो आणि मन आनंदी होतं. शेवटी काय हो भेटी नाही झाल्या तरी गाठी बसणं महत्वाचं. ज्यांनी हे जाणलं त्यांनी माणसातलं माणूसपण जाणलं. पु ल नी मैत्री विषयी किती छान शब्दात लिहिलंय. मैत्री अशीच असते अगदी सुंदर. ज्याने मैत्रीचे सुंदर नाते जपले त्याचे जीवन आनंदाने फुलून गेले. मैत्रीसारखे सुंदर नाते या जगात दुसरे कोणतेही नाही, ज्याला मैत्री समजली त्याला जीवन समजले.

**– श्याम बसप्पा ठाणेदार**

# शीर्षस्थानी सत्यमेव जयते...!! पक्षांपेक्षा इतिहास अधिक दयाळू..!!

रविवार विशेष.. कव्हर स्टोरी!

भारतीय राजकारणात अनेकदा आरोपांची अशी वादळे उठलेली आहेत, ज्यामध्ये सत्य, संयम व प्रामाणिकपणाची कसोटी लागलेली आहे. हे वादळ शमल्यानंतर उशिराने का होईना, परंतु सत्य ठामपणे आपल्या जागी उभे असल्याचे दिसून आले आहे. याचा प्रत्यय तालाबीरा कोळसा खाण वाटप प्रकरणात (कोलगेट) सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाने पुन्हा एकदा आणून दिला आहे. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्यावरील सर्व आरोप रद्द करत सर्वोच्च न्यायालयाने त्यांना या प्रकरणी पूर्णपणे निष्कलंक अर्थात निर्दोष ठरवले आहे. कोळसा घोटाळा हा देशातील सर्वात मोठ्या घोटाळ्यांपैकी एक मानला जातो. मुळात हे संपूर्ण प्रकरण २००५ मधील ओडिशातील 'तालाबीरा' कोळसा खाण वाटपाशी संबंधित आहे. ही खाण सुरुवातीला 'एनएलसी' या सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीला मिळणार होती. परंतु, उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला यांच्या 'हिंदाल्को' कंपनीच्या अर्जानंतर सर्व नियम बाजूला ठेवून ही खाण त्यांना देण्यात आली. त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्याकडेच कोळसा मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्यामुळे छाननी समितीच्या शिफारशी बदलून या निर्णयाला मंजुरी देण्यामध्ये त्यांच्या भूमिकेवर विरोधकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. विशेष म्हणजे डॉ. मनमोहन सिंग हे पंतप्रधान असूनही विशेष सीबीआय न्यायालयाने या प्रकरणात त्यांच्यासह उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला, माजी कोळसा सचिव पी. सी.पारेख आणि अन्य तीन जणांना आरोपी म्हणून समन्स बजावले होते. किमान इतके स्वातंत्र्य त्यांच्या कार्यकाळात देशातील स्वायत्त संस्थांत टिकून होते. समन्स मिळाल्यानंतर डॉ. मनमोहन सिंग यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. तत्कालीन सरन्यायाधीशांनी प्राथमिक सुनावणीदरम्यान समन्सला स्थगिती दिली, त्यानंतर हे प्रकरण बराच काळ न्यायालयात प्रलंबित राहिले. या काळात, सीबीआयने या प्रकरणाचा सखोल तपास करत न्यायालयात एक क्लोजर रिपोर्ट दाखल केला, ज्यात म्हटले होते की, माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यावर खटला चालवण्यासाठी उपलब्ध पुराव्यांमध्ये पुरेशी कारणे नाहीत. मात्र, त्यावेळी सीबीआय न्यायालयाने हा क्लोजर रिपोर्ट फेटाळून लावला होता. त्यानंतर मनमोहन सिंग यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची, न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने मात्र सीबीआयने दाखल केलेला हा क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार खरे तर क्लोजर रिपोर्ट फेटाळण्याचे कोणतेही विशेष कारण सीबीआय न्यायालयाच्या न्यायाधीशांकडे नव्हते. अपीलकर्त्याच्या दुर्दैवी निधनामुळे हे अपील निष्फळ ठरवता आले असते. तरी, सीबीआयने दाखल केलेल्या दोन्ही क्लोजर रिपोर्टचा सर्वोच्च न्यायालयाने अभ्यास करत हा निकाल दिला आहे.

युपीए-२ सरकारच्या काळात भाजप आणि विरोधी पक्षांनी कोळसा खाण वाटप व २जी स्पेक्ट्रमच्या मुद्द्यावरून सरकारला पार घेरले होते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात 'दोन लाख कोटी रुपयांचा कोळसा घोटाळा' असा उल्लेख करत नरेंद्र मोदींनी डॉ. मनमोहन सिंग यांच्या वैयक्तिक प्रतिमेवर आणि प्रामाणिकपणावर चिखलफेक केली. इतकेच नव्हे, तर २०१७ मध्ये संसदेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, सर्व घोटाळे होऊनही त्यांच्यावर एकही काळी खूण नाही, बाथरूममध्ये रेनकोट घालून आंघोळ कशी करायची हे फक्त डॉ.साहेबांनाच माहीत आहे, अशी उपरोधिक व अत्यंत वैयक्तिक स्वरुपाची टीका त्यांच्यावर केली होती. देशाच्या आर्थिक औद्योगिकीकरणाचे शिल्पकार आणि अत्यंत शांत, अभ्यासू व्यक्तिमत्त्व असलेल्या पंतप्रधानांना 'कमकुवत पंतप्रधान' म्हणून हिणवण्यात आले.

२०१४ मध्ये पंतप्रधानपदावरून पायउतार होण्यापूर्वी घेतलेल्या आपल्या शेवटच्या पत्रकार परिषदेत डॉ. मनमोहन सिंग यांनी शांत पण ठाम शब्दांत एक वाक्य उच्चारले होते. माझ्या समकालीन माध्यमांपेक्षा आणि विरोधी पक्षांपेक्षा इतिहास माझ्याशी अधिक दयाळू असेल. इतिहासच माझ्या कामगिरीचे आणि सचोटीचे योग्य मूल्यमापन करेल. आज न्यायालयाच्या या निकालाने त्यांचे ते शब्द तंतोतंत खरे ठरले आहेत. ज्या आर्थिक व औद्योगिक धोरणांमुळे देशाचा पाया मजबूत झाला, त्यावर राजकीय स्वार्थासाठी भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. परंतु, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने सर्व राजकीय टीकाकारांचे दावे आणि आरोप फोल ठरवले आहेत. राजकारणात तत्कालीन फायद्यासाठी कुणाच्याही चारित्र्यावर व प्रामाणिकपणावर शिंतोडे उडवणे सोपे असते; परंतु काळाच्या कसोटीवर केवळ सत्य टिकून राहते. डॉ. मनमोहन सिंग यांचे सामर्थ्य दीड-दीड तास वायफळ भाषण करण्यापेक्षा धोरणात्मक निर्णयक्षमता आणि संयम हे होते. डॉ. मनमोहन सिंग यांची कणखरता ही त्यांच्या बौद्धिक क्षमतेत, आर्थिक दूरदृष्टीत आणि प्रतिकूल परिस्थितीतही राजकीय दबाव न मानता योग्य निर्णय घेण्याच्या धैर्यात होती. त्यामुळे ताकद केवळ वक्तृत्वात नसते, तर राष्ट्रहिताच्या निर्णयात असते, हे त्यांनी त्यांच्या कार्यकाळात सिद्ध केले. डॉ. मनमोहन सिंग यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञ व निष्कलंक नेत्यावर भाजपच्या ज्या ज्या नेत्यांनी बिनबुडाचे आरोप केले, त्या सर्वांनी नाक घासून दिवंगत माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांची माफी मागायला हवी. शेवटी नियती आणि न्यायदेवता उशिरा का होईना, पण सत्य समोर आणतेच, हेच या प्रकरणाने सिद्ध केले आहे. शेवटी सत्याचाच विजय होतो. म्हणूनच भारताच्या महत्वाच्या आस्थापनांच्या शीर्षस्थानी सत्यमेव जयते, हे वाक्य लिहिलेले असते. मनमोहन सिंग आज हयात नाहीत, पण त्याची विश्वासार्हता पुन्हा एकदा उजळून निघाली आहे.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल –कोल्हापूर.**

# मित्रांची संगत म्हणजे जीवनात रंगत !

२ ऑगस्टला भारतात जागतिक मैत्री दिन साजरा केला जात आहे.इतर देशांमध्ये ३१ जुलैला जागतिक मैत्री दिन साजरा करण्यात आला.मैत्री दिन साजरा करताना मित्रांची आठवण तर हमखास येणारच.मित्र सोबत असताना, मित्रांसोबत मनसोक्त गप्पा मारताना आणि मित्रांच्या संगतीत हसी मजाक करताना आगळावेगळा आनंद मिळतो. आजच्या धकाधकीच्या व संघर्षपूर्ण जीवनात यशस्वी व्हायचे असेल,जीवन आनंदाने जगायचे असेल तर जीवनात मित्र असणे फार गरजेचे आहे. चांगल्या मित्रांची संगत आपल्या जीवनात रंगत आणते.ज्यांना मित्र नसतात त्यांचे जीवन बेचव,निरस आणि कंटाळवाणे झालेले असते. ज्यांना एकही मित्र नसतो ते कपाळकरंटे समजले जातात. आजकाल कोणालाही कोणत्याही वयात हृदयविकार होत आहे आणि व्यक्ती दगावत आहेत.हृदयविकारावर उपचार करणारे डॉक्टर नेहमी जीवनात मित्रांचे महत्त्व समजावून सांगतात.

मनात दाटून राहणारे दुःख,मनाच्या व्यथा आणि वेदना वेळीच बाहेर पडणे गरजेचे असते. नाहीतर टेंशन अवजड ठरते आणि जीवनातील रंगत संपते. नेहमी हसतखेळत राहायचे असेल, आनंदी जीवन जगायचे असेल तर मित्रांच्या गराड्यात रमले पाहिजे.विनोद व चुटकुले सांगून मनसोक्तपणे हसले पाहिजे.मित्र एकमेकांचे चेहरे पाहून दुःख ओळखतात,दुःख व्यक्त करायला शिकवतात.मित्रांनी मित्रांसोबत मित्रांसारखे राहणे आणि जीवनाला आनंदी करणे म्हणजे मैत्री. मित्र जीवाचे, मित्र वणव्यात गारवा देणारे,मित्र दुःखात सर्वांच्या अगोदर जवळ येऊन पाठीवर हात ठेवून सगळं काही ठीक होईल म्हणून सांगणारे असले पाहिजेत.

सुखदुःखात मानसिक व आर्थिक आधार देणे मित्र लाभणे आजच्या काळात तर अत्यावश्यक बाब झाली आहे.

मैत्री म्हणजे निखळ आनंद देणारा स्नेह असतो.मैत्रीच्या नात्यात जात,धर्म, गरीबी,श्रीमंती,स्वार्थ,वय,देखावा यांना स्थान नसते.बालपणीचे मित्र, कुमार वयातील मित्र,तारुण्यातील मित्र आणि प्रौढ अवस्थेतील मित्र हे हृदयाच्या कोपऱ्यात बंदिस्त झालेले असतात. त्यांची आठवण येणे,त्यांना भेटणे,भेट शक्य नसेल तर फोनवरून संवाद साधणे हे मैत्री जीवंत ठेवण्याचे लक्षण असते.डॉ.प्रमोद भोगील,डॉ.संभाजी गरड,अशोक कांबळे हे माझे शालेय मित्र त्यांचा बिझी शेड्युल बाजूला ठेवून ठराविक कालावधीनंतर मला फोन करतात.कॉलेज जीवनातील माझे मित्र युवराज चव्हाण,मंगेश देशपांडे,सतीश पाटील,धनंजय पाटील व नानासाहेब यादव यांच्याशी असलेले मैत्रीचे नाते कायम दृढ आहे.मी माझ्या गावाकडे गेल्यावर अनिल कांबळे,दयानंद वाघमारे,नरसिंग गुळवे,दयानंद गुळवे, संजय अर्थमवार आणि दिपक रणक्षेत्रे ह्या मित्रांची भेट घेऊन मनसोक्त गप्पा मारल्या शिवाय मन प्रसन्न होत नाही.

शिक्षकी पेशांत मला अनेक चांगले मित्र लाभले.रामचंद्र देमगुंडे,माधव वाघमारे,शिवदास माटोरे,एकनाथ पलमटे,विलासराव आगलावे,राजकुमार जमादार,अनंत धुळशेट्टे,रामराव चव्हाण, शिवराज गोरगे,बळीराम काकडे,मारोती रुद्रावाड आणि कार्तिक घाटीवाले यांच्याशी जडलेले मैत्रीचे हळवे नाते आजही कायम आहे.सध्या मी ज्या शाळेत नोकरी करतोय त्या शाळेतील माझे सहकारी शिक्षक भगवानराव केंद्रे, बालाजी नाईक,उत्तम घोडके,संजय पालकुर्तावार,विनायकराव दराडे,भरत जाधव,रमेश कासले,उध्दव साळवे हे माझे चांगले मित्र आहेत.दत्तात्रय मोहिते,प्रजाल शिंदे,बालाजीराव केंद्रे, प्रकाश नागरगोजे,शिवाजी नामपल्ले हे माझे जिवाभावाचे मित्र आहेत.यांच्याशी जडलेले मैत्रीचे नाते घट्ट झाले आहे. एवढ्या मित्रांची संगत लाभणे म्हणजे मी माझे भाग्य समजतो.यांच्यामुळे मला मैत्रीचा अर्थ कळाला,मित्रत्वाचा आनंद लाभला.

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९५४५४४२६४८.**

## पुरस्कार

पाहिले जाते आधी
कोण देतो पुरस्कार
वैयक्तिक हेवा दावा
उगा वाढे तिरस्कार

शत्रूची खुर्ची शेजारी
आयोजकीचमत्कार
कशा टाळता नजरा
अवघडला नमस्कार

सुस्पष्ट दिसे नाराजी
उफाळून ये अहंकार
वेळ मिळता भाषणां
वाजतो शब्द टण्कार

आयोजकांची परिक्षा
साधा नीट परिष्कार
उत्तर दक्षिण एकत्रीत
अलौकिकआविष्कार

संम्मेलन सुवर्ण संधी
कसा टाकू बहिष्कार
होता उद्रेक अतिरेक
मुलाखतीतभुभुःकार

पुरस्कारसन्मान राखे
सुसंस्कृत मनांस भार
चुकून राहू नये कुणी
मानत असता आभार

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# अनेक उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिकता जोपासणाऱ्या मित्रांची नितळ आणि निखळ मैत्री

चिमूर तालुक्यातील गोंदेडा तपोभूमीच्या पायथ्याशी असलेल्या वडसी येथील भूपेश पाटील आणि उसेगाव येथील सुरेश डांगे यांची २८ वर्षांपूर्वी कुमारवयात झालेली मैत्री अबाधित असून दोघेही वेगवेगळ्या क्षेत्रात व शहरात असले तरी आजही धडपडे मित्र म्हणून तालुक्यातील पंचक्रोशीत प्रसिद्ध आहेत.

सन १९९५ मध्ये सुरेश नेरी येथील जनता विद्यालयातून दहावी उत्तीर्ण होऊन अकरावीत शिकायला नागपूरला गेला. ज्या शाळेचा त्याने निरोप घेतला होता त्याच नेरी येथील जनता विद्यालयात काही कारणास्तव परत १९९७ ला कला शाखेत बारावीकरिता प्रवेश घ्यावा लागला. त्यामुळे तेथील बरेच विद्यार्थी सुरेशसाठी नवीन होते. अशा परिस्थितीत दोनचार दिवसांतच त्या वर्गातील एका चुणचुणीत मुलाने माझं लक्ष वेधलं असं सुरेश सांगतो.बोलघेवडा,बडबड्या,हजरजवाबी, विनोदबुद्धी आणि आत्मविश्वासाने ओतप्रोत असलेल्या भूपेश पाटील आणि सुरेश डांगे यांची एकाच आठवड्यात चांगली गट्टी झाली.ती गट्टी,मैत्री आजही २९ वर्षाच्या कालखंडानंतरही ताजीतवानी असल्याचे प्रकर्षाने जाणवते. दोघेही धडपडे असल्याने आणि काही नवीन करण्याची उर्मी यामुळे त्यांची मैत्री अधिक घट्ट झाली.

बारावीच्या परीक्षेत भूपेश पाटील नागपूर बोर्डात पाचवा मेरिट आला होता.नंतर तो वकिलीच्या अभ्यासक्रमाला गेला.सुरेश डांगे डी. एड.करुन शिक्षक झाला.भूपेश पाटील आज नागपूर येथील उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठात निष्णात वकील म्हणून काम करतोय.शेकडो अन्यायग्रस्त नागरिकांना त्याने न्याय मिळवून दिला आहे.नागरिकांना त्यांचे हक्क मिळवून दिले आहे.दोघेही सामाजिक जाणीवेचे असल्याने तरुण वयातच अनेक सामाजिक उपक्रम त्यांनी राबविले. त्यांचं शिक्षण सुरु असतानाच त्यांनी २००१ मध्ये तपोभूमी या नावाचं मासिक भूपेश पाटील यांच्या संकल्पनेतून सुरु केलं होतं.भूपेश पाटील यांनी संपादक तर सुरेश डांगे यांनी कार्यकारी संपादक म्हणून या मासिकाची जबाबदारी पार पाडली.साहित्य, समाजसेवा या गोष्टींची दोघांनाही सारखीच आवड असल्याने स्थिरस्थावर झाल्यावरही दोघांच्या सामाजिक कार्यात खंड पडला नाही तर तो अधिकच बहरास आला.समाजातील अनेक घटकांना आपल्या परीने शैक्षणिक,सामाजिक मदत करण्याचा भूपेश आणि सुरेश यांचा प्रयत्न राहिला आहे.समाजातील उपेक्षित घटकांसाठी काम करणे ही आनंदाची आणि समाधानाची बाब असल्याचे दोघेही मानतात.२०१९ मध्ये चिमूर येथे अखिल भारतीय आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन दोघांच्या नेतृत्वात झाले. अनेक कविसंमेलने,ग्रंथ प्रकाशन कार्यक्रम त्यांनी स्थापन केलेल्या वामनराव पाटील स्मृती प्रतिष्ठानच्या माध्यमातून यशस्वीरित्या पार पाडली.विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर,ग्रामीण भागातील कवी आणि लेखकांच्या पुस्तकांचे प्रकाशन,सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार, बुद्धविहारांना ध्वनीक्षेपक, ग्रंथांचे वितरण, उपक्रमशील शिक्षकांचा गौरव,गुणवत्ताप्राप्त विदयार्थ्यांचा सत्कार, आदर्श बुद्ध विहार स्पर्धा असे अनेक उपक्रम भूपेश पाटील आणि सुरेश डांगे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने राबविले. भूपेश पाटील विद्यार्थीदशेत अनेक संस्था,संघटनांशी जुळले. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांशी त्यांचा निकटचा संबंध आला.पुढे त्यांचं कायद्याचं शिक्षण घेऊन ते नागपूरला उच्च न्यायालयात वकिलीचा व्यवसाय सुरु केला.ॲड.भूपेश पाटील यांनी अनेक राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग घेऊन आपल्या अभ्यासू वृत्तीने आपला वेगळा ठसा उमटवला. अनेक संस्था,सेमिनार,महाविद्यालयात व्याख्याने दिली.प्रखर आंबेडकरवादी विचारवंत म्हणून त्यांची वेगळी ओळख आज समाजात आहे.'गाव पेटून उठतो तेव्हा' हा त्यांचा प्रसिद्ध काव्यसंग्रह आहे.अनेक ग्रंथांना त्यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत.विद्यार्थीदशेपासून विविध आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.भूपेश पाटील यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारे सच्चे कार्यकर्ते म्हणून ओळखल्या जाते.सुरेश डांगे हे अनेक सामाजिक संघटनांशी जुळलेले आहेत.साहित्य, समाजसेवा या घटकांशी त्यांची नाळ जुळली असल्याने या क्षेत्रात ते सदैव काम करीत असतात.त्यांनी अनेक स्मरणिकांचे संपादन केले आहे.'तू हसलीस म्हणजे' हा त्यांचा वैशिष्ट्यपूर्ण चारोळीसंग्रह प्रसिद्ध आहे.त्यांनीसुद्धा काही साहित्यिकांच्या ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या आहेत.शिक्षक चळवळीत देखील अनेक वर्षांपासून ते सक्रिय आहेत.उपक्रमशील शिक्षक म्हणून ते विद्यार्थ्यांसाठी सातत्याने नवीन उपक्रम राबवित असतात.अनेक कार्यक्रमांचे नियोजनबद्ध आयोजन त्यांनी केले आहे.आपापल्या क्षेत्रात कार्य करत असताना समाजासाठी आपण काही केले पाहिजे या उदात्त हेतूने भूपेश पाटील आणि सुरेश डांगे सामाजिक भावनेने करीत असलेले काम निश्चितच प्रेरणादायी आहे. निखळ मैत्री असलेल्या दोन मित्रांची ही मैत्री अशीच बहरत राहो आणि त्यांच्या हातून अधिकाधिक नवनिर्माण होत राहो ही मैत्री दिनानिमित्त मनःपूर्वक सदिच्छा!

**– नितीन पाटील,**
**वडसी ता.चिमूर जि.चंद्रपूर ९५२७३१९७६०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### आण्णाभाऊंनी कष्टकऱ्यांच्या भावना जगासमोर मांडल्या - प्राचार्य बाळासाहेब खिलारी

### ढोकेश्वर विद्यालयात टिळक-आण्णाभाऊ जयंती वक्तृत्व स्पर्धा संपन्न




**अक्षराज : वसंत रांधवन**

**दि.०१, अहिल्यानगर :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील ढोकेश्वर विद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे माजी उपाध्यक्ष स्व. रामनाथजी वाघ यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य बाळासाहेब खिलारी म्हणाले, अवघे दीड दिवस शाळेत गेलेले आण्णाभाऊ साठे यांनी प्रतिकूल परिस्थितीत जिद्द आणि मेहनतीच्या बळावर मोठे यश मिळवले. त्यांनी आपले साहित्य, शाहीरी आणि लोककलेतून समाजातील वंचित, कष्टकरी आणि सामान्य माणसाच्या व्यथा आणि भावना जगासमोर मांडल्या. या दिनानिमित्त विद्यालयात पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा दोन गटात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. प्रियल झावरे, मनस्वी झावरे, विराज बांडे, कृष्णा दिवेकर, वैष्णवी चव्हाण, आर्यन भद्रे, प्रज्वल आल्हाट यांसह १९ विद्यार्थ्यांनी तीनही विभूतींच्या जीवनावर प्रभावी भाषणे सादर केली.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून सुमन वाळुंज, वर्षा भोंडवे आणि विष्णू भद्रे यांनी काम पाहिले. पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी, शिस्त, परिश्रम आणि मानवतेची मूल्ये आत्मसात करण्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला निलम खिलारी, प्रिया डव्हणे, कल्पना जाधव, अतुल सैद, संदीप खिलारी यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी केले, प्रास्ताविक रविंद्र मते यांनी केले तर आभार वैशाली गायखे यांनी मानले.

## माथेरानच्या वीज वितरण व्यवस्थेचा नव्याने आराखडा तयार करण्याची मागणी




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०१, माथेरान :** देशातील महत्त्वाचे पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान शहरातील वाढत्या वीज समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी संपूर्ण वीज वितरण व्यवस्थेचा नव्याने आराखडा तयार करून त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे माथेरान शहराध्यक्ष प्रवीण वसंत सकपाळ यांनी महावितरणच्या मुख्य अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, माथेरान शहराची अर्थव्यवस्था पूर्णपणे पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहे. मात्र शहराला सध्या मिळणारा वीजपुरवठा हा जुन्या आणि अपुऱ्या यंत्रणेवर आधारित असल्याने वारंवार वीज खंडित होणे, कमी दाबाचा (लो-व्होल्टेज) वीज पुरवठा, ट्रान्सफॉर्मरची अपुरी क्षमता आणि जीर्ण झालेल्या वीजवाहिन्यांमुळे नागरिक, व्यापारी, हॉटेल व्यावसायिक तसेच पर्यटकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. जवळील शहरांचा वेगाने होणारा विकास लक्षात घेता माथेरानच्या वाढत्या वीज गरजा पूर्ण करण्यासाठी नवीन नियोजनाची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.या पार्श्वभूमीवर माथेरानसाठी स्वतंत्र वीज पुरवठा व्यवस्था उभारणे, अधिक क्षमतेचे नवीन ट्रान्सफॉर्मर बसविणे, जुन्या एस.टी. व एल.टी. वीजवाहिन्यांचे आधुनिकीकरण करणे, ट्रान्सफॉर्मरची नियमित देखभाल व संरक्षण व्यवस्था निर्माण करणे, शहरात स्वतंत्र मेंटेनन्स सेंटर व वीज तक्रार निवारण केंद्र सुरू करणे, आवश्यक तांत्रिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे तसेच कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या जीर्ण इमारतीची दुरुस्ती करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना राहण्यायोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याचा परिणाम केवळ नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरच नव्हे, तर पर्यटन व्यवसायाच्या प्रतिमेवर ही होत असल्याने माथेरानच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन संपूर्ण वीज वितरण व्यवस्थेचा आधुनिक व सक्षम आराखडा तयार करून त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी आग्रही मागणी प्रवीण सकपाळ यांनी महावितरणकडे केली आहे.

## घोसरी लालहटी गावातील शालेय विद्यार्थ्यांना नोटबुक पेनचे वितरण



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, पोभुर्णा (चंद्रपूर) :** बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय विकास म हापुरुष लोकनेते आमदार नामदार सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती उंचवावी तसेच विद्यार्थी टिकला पाहिजे आणि शिकला पाहिजे.

ह्या उदात्त हेतूने पोभुर्णा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र मरपलीवार यांच्या हस्ते तालुक्यातील घोसरी लालहेटी येथील शालेय विद्यार्थ्यांना नुकतेच नोटबुक लेखणीचे वितरण करण्यात आले. सुरवातीच्या काळात सभापती रवींद्र मरपलीवार यांनी शाळेला भेट देत विद्यार्थ्यांसोबत सुसंवाद साधुन जनरल नॉलेज याची माहिती विचारण्यात आली त्यानंतर नोटबुक पेन आणि चाकलेट वितरण करण्यात आले होते.

घोसरी येथील सताविस विद्यार्थी तर लालहेटी येथील सर्व विद्यार्थ्यांना नोटबुक देण्यात आले होते. ह्या सामाजिक उपक्रमामुळे सभापती रवींद्र मरपलीवार यांचे पालक विद्यार्थी शिक्षक यांच्याकडून कौतुक केले जात आहे. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विनोद पुडके पालक प्रतिष्ठीत नागरिक ग्रामपंचायत सदस्य तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिंतूर तहसील कार्यालय परिसर जलमय

## मुद्रांक विक्रेते व नागरिकांची मोठी गैरसोय; प्रशासनाचे दुर्लक्ष उघड



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०१, जिंतूर (परभणी) :** जिंतूर शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे तहसील कार्यालय परिसरातील मुद्रांक (स्टॅम्प) विक्रेत्यांच्या दुकानांसमोर अक्षरशः पाण्याचे तळे साचले आहे. तहसील कार्यालयात दररोज शेकडो नागरिक सातबारा, उत्पन्न, जात, अधिवास, नोंदणी, मुद्रांक खरेदी व इतर शासकीय कामांसाठी येत असतात. मात्र कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळच पाणी साचल्याने नागरिकांना अक्षरशः पाण्यातून वाट काढत जावे लागत आहे. पावसाचे पाणी निचऱ्याअभावी मोठ्या प्रमाणात साचल्यामुळे मुद्रांक विक्रेत्यांच्या व्यवसायावर ही परिणाम होत आहे. ग्राहकांना दुकानापर्यंत पोहोचण्यासाठी चिखल आणि साचलेल्या पाण्यातून चालावे लागत असल्याने अनेक जण त्रस्त झाले आहेत. ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग आणि शेतकरी यांना विशेषतः मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती, दुर्गंधी आणि संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला आहे. तहसील कार्यालयासारख्या महत्त्वाच्या शासकीय कार्यालयाच्या परिसरात अशी परिस्थिती निर्माण होणे हे प्रशासनाच्या नियोजनातील त्रुटी दर्शवणारे असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रत्येक पावसाळ्यात हीच समस्या निर्माण होते. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य नाले, गटारी व निचऱ्याची व्यवस्था नसल्याने संपूर्ण परिसर जलमय होतो. त्यामुळे संबंधित विभागाने कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

दरम्यान, या समस्येकडे तहसील प्रशासन, नगर परिषद आणि संबंधित बांधकाम विभागाने तातडीने लक्ष देऊन साचलेल्या पाण्याचा निचरा करावा, परिसर स्वच्छ करावा आणि भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिक, मुद्रांक विक्रेते आणि वकिलांकडून होत आहे.

तहसील कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना सुविधा मिळायला हव्यात; मात्र येथे पाण्यातून मार्ग काढण्याची वेळ येत असेल, तर ही बाब अत्यंत गंभीर असून संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेणे गरजेचे आहे.

## पारनेर आगारात 'राजमाता जिजाऊ' च्या अत्याधुनिक एसटी दाखल

### आ.दातेंच्या पाठपुराव्याला यश; महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठांना मोठा दिलासा



**अक्षराज : वसंत रांधवन**

**दि.०१, अहिल्यानगर :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दिशेने आज आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले. आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या 'राजमाता जिजाऊ' बससेवेअंतर्गत पारनेर आगाराला ५ अत्याधुनिक एसटी बसेस प्राप्त झाल्या आहेत.

शनिवार, दिनांक ०१ ऑगस्ट २०२६ रोजी पारनेर बसस्थानकात उत्साहपूर्ण वातावरणात आमदार दाते यांच्या शुभहस्ते या बसेसचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी महायुतीचे पदाधिकारी, एसटी महामंडळाचे अधिकारी-कर्मचारी, चालक-वाहक आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना आमदार दाते म्हणाले, पारनेर आगाराच्या विकासासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. त्यामुळेच यापूर्वी ही अनेक नवीन बसेस उपलब्ध झाल्या. आता 'राजमाता जिजाऊ'च्या ५ बसेस दाखल झाल्याने प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाचा लाभ मिळणार आहे. कालच रुजू झालेले डेपो व्यवस्थापक अमोल कोतकर यांनी विशेष प्रयत्न करून या बसेस मंजूर करून घेतल्या. या बसेसम ध्ये अधिक आसनक्षमता, सुधारित सुविधा आणि प्रवासी सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. पारनेर आगाराला या ५ नवीन बसेस मिळाल्याने तालुक्यातील सार्वजनिक वाहतुकीला नवी गती मि ळणार असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

> जेष्ठ पत्रकार संजय वाघमारे यांनी सांगितले की,एसटी महामंडळ दर्जेदार सेवेकडे वाटचाल करत आहे. पारनेरला अधिक बसेस मिळाव्यात. तर राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षा सुषमा रावडे म्हणाल्या, आमदार दाते सरांचे जनतेच्या मूलभूत सुविधांसाठीचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत.

# पारनेरमध्ये निर्भया पथक स्थापन करण्याची मागणी

## विद्यार्थीनी व महिलांच्या सुरक्षेसाठी सुषमा रावडे यांचे पोलीस प्रशासनाला निवेदन


**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पारनेर पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र निर्भया पथक स्थापन करून ते प्रभावीपणे कार्यान्वित करावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे यांनी यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी आज पारनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षकांना निवेदन सादर केले.

महिला सक्षमीकरण, सामाजिक प्रश्नांबाबत सातत्याने पाठपुरावा आणि महिलांच्या हक्कांसाठी सक्रियपणे काम करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे यांनी ही मागणी पुढे आणली आहे. तालुक्यातील विद्यार्थिनी, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

निवेदनात पारनेर पोलीस स्टेशन अंतर्गत निर्भया पथकाची तातडीने स्थापना करून त्याचे नियमित गस्त व जनसंपर्क उपक्रम राबविण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच तालुक्यातील प्रमुख चौक, सार्वजनिक ठिकाणे, शासकीय कार्यालये, बसस्थानके आणि गर्दीच्या परिसरांमध्ये निर्भया पथकाची माहिती, संपर्क क्रमांक आणि कार्यपद्धती दर्शविणारे माहिती फलक व बॅनर्स लावण्यात यावेत, असेही नमूद करण्यात आले आहे.

महिलांमध्ये आणि विद्यार्थिनींमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी माहितीपत्रकांचे वितरण करण्यात यावे, तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये महिला सुरक्षेसंदर्भात मार्गदर्शनपर कार्यक्रम, जनसंवाद उपक्रम, प्रबोधनपर सत्रे आणि कायदेशीर हक्कांविषयी जनजागृती मोहीम राबविण्यात यावी, अशी मागणी ही निवेदनाद्वारे करण्यात आली. याशिवाय फेसबुक, व्हॉट्सअप, इन्स्टाग्राम यांसारख्या सोशल मीडिया म ाध्यमांद्वारे निर्भया पथकाची माहिती, संपर्क क्रमांक आणि नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सेवांचा सातत्याने प्रचार-प्रसार करण्यात यावा, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळू शकेल, असेही रावडे यांनी म्हटले आहे.



> पारनेर तालुक्यात निर्भया पथकाची स्थापना झाल्यास महिलांना तातडीची मदत मिळेल, तसेच छेडछाड, अत्याचार आणि महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांना आळा बसेल पोलीस प्रशासनाने या मागणीची सकारात्मक दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी आमची अपेक्षा व्यक्त केली.
>
> **- सुषमा रावडे**
>
> **(तालुकाध्यक्षा राष्ट्रवादी महिला काँग्रेस, पारनेर)**

## सावली तालुक्यात वाघाच्या हल्ल्यात ७५ वर्षीय गुराख्याचा दुर्दैवी मृत्यू



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, सावली (चंद्रपूर) :** सावली वनपरिक्षेत्रातील सामदा परिसरात वाघाच्या हल्ल्यात ७५ वर्षीय गुराख्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना दिनांक ०१ ऑगस्ट रोजी उघडकीस आली. या घटनेमुळे सामदा परिसरासह संपूर्ण सावली तालुक्यात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाच्या प्राथमिक अहवालानुसार, हिरामण मार्कहांडी साखरे (वय ७५, रा. सामदा, ता. सावली) हे गुरे चारण्यासाठी जंगल परिसरात गेले होते. दरम्यान, सामदा बीटमधील कंपार्टमेंट क्रमांक १५०१ येथे वाघाने त्यांच्यावर हल्ला केल्याचे प्राथमि क अहवालात नमूद करण्यात आले आहे. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती १ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे १.५० वाजता वनविभागाला मिळाली. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी सुरू केली. हा परिसर सावली वनपरिक्षेत्रातील व्याहाड राऊंड, सामदा बीट अंतर्गत येतो.

या घटनेमुळे जंगलालगतच्या गावांमध्ये पुन्हा एकदा मानव-वाघ संघर्षाचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. गुरे चारण्यासाठी जंगलात जाणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, वनविभागाने नागरिकांना जंगल परिसरात एकट्याने न जाण्याचे आवाहन करणे गरजेचे झाले आहे. दरम्यान, घटनेची पुढील कार्यवाही वनविभागाकडून सुरू असून, मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना शासनाच्या नियमानुसार मदत मिळेल का, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# दिव्यात शेजाऱ्याला मारहाण व जीवे मारण्याची धमकी प्रकरणी गुन्हा दाखल

## अनधिकृतपणे नगरसेवक असल्याचा गाडीवर लोगो




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०१, दिवा (ठाणे) :** पोलीस माझे काहीही करू शकत नाही मी मोठया राजकीय पक्षात असून अनधिकृतपणे नगरसेवक असल्याचा गाडीवर लोगो लावून फिरणारा दिवा शहरातील उच्चभ्रू असलेल्या चंद्रागण संकुलातील ९ व्या मजल्यावर राहणाऱ्या सुशिल पांडे यांच्या कुटुंबाकडून शेजारी राहणाऱ्या कुटुंबाला शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मुंब्रा पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. सदरचा रूम तुम्ही मला विकून येथून निघून जाण्याची शेजारील रूम क्र ९०४ चे मालक गुप्ता यांनी दिली असल्याने सदर कुटुंब प्रचंड तणावाखाली आले आहे. सुशिल पांडे यांच्यासह संपूर्ण कुटुंबाकडून आम्हाला धोका असल्याची जुलै महिन्यात ७ जुलै व २९ जुलै २०२६ रोजी पोलीस तक्रार करण्यात आली असून हे कुटुंब न्यायाची प्रतीक्षा करत आहे.

तक्रारदार राजकुमार गुप्ता यांनी दिलेल्या तक्रारीनुसार २८ जुलै २०२६ रोजी रात्री २ वाजता संबंधित प्रकार घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. तक्रारीमध्ये आरोपीकडून शिवीगाळ व धमकी देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून या प्रकारामुळे कुटुंबामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे. संबंधित सुशिल पांडे यांचे व्यावसायिक व राजकीय संबंध असल्याने आपल्यावर कोणतीही कारवाई होणार नाही व पोलीस माझे काहीही वाकड करू शकत नसल्याची भाषा सदर रूमच्या भाडेकरूला वापरल्याचा आरोपही करण्यात आला आहे. आम्हाला आमच्या कुटुंबाच्या सुरक्षेची चिंता असून या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून न्याय मिळावा अशी अपेक्षा तक्रारदार कुटुंबाने व्यक्त केली आहे. या प्रकरणात पोलिसांकडून पुढील कायदेशीर प्रक्रिया आणि चौकशी काय होते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अल्याणीला खा.म्हात्रेंची विकासाची मोठी भेट; समाजमंदिराच्या लोकार्पणावेळी दर्जेदार कामाचे भरभरून कौतुक



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, शहापूर (ठाणे) :** भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट, खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे यांनी दिलेले आणखी एक आश्वासन पूर्ण करत स्थानिक खासदार निधी २०२५–२६ अंतर्गत आल्याणी (विठ्ठलगाव) येथे उभारण्यात आलेल्या भव्य, सुसज्ज व दर्जेदार समाजमंदिर (समाजहॉल) चे लोकार्पण आज त्यांच्या शुभहस्ते जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र विशे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. गावाच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेला पूर्णविराम देणारा हा समाज हॉल ग्रामस्थांसाठी विकासाची मोठी भेट ठरला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज सुविधा उपलब्ध झाल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

लोकार्पण सोहळ्यात बोलताना खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांनी सम ाजहॉलच्या उत्कृष्ट व दर्जेदार बांधकाम ाबद्दल ठेकेदार भगवान निमसे यांचे विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले, शहापूर तालुक्यात माझ्या खासदार निधीतून २५ ते ३० समाजमंदिरे मंजूर केली आहेत. मात्र त्यापैकी उद्घाटन होणारे हे पहिलेच समाजमंदिर आहे. यापुढेही अशीच गुणवत्तापूर्ण आणि दर्जे दार विकासकामे व्हावीत.

समाजमंदिराची पाहणी केल्यानंतर खासदारांनी आपल्या भाषणात दोन वेळा ठेकेदार भगवान निमसे यांच्या कामाचे जाहीर कौतुक केले. अंदाजपत्रकापेक्षा अधिक खर्च करून आकर्षक व गुणवत्तापूर्ण बांधकाम केल्याबद्दल त्यांनी त्यांचे अभिनंदन केले. अनेक अडचणींवर मात करून उभारण्यात आलेले हे समाजमंदिर गावाच्या विकासाचा आदर्श ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी ग्रामस्थांनी खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांचा पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्ष भेट देऊन सत्कार केला. तसेच गावातील विविध विकासकामांच्या मागण्या मांडल्या असता त्या सकारात्म कपणे मार्गी लावण्याचे आश्वासन ही खासदारांनी दिले. यावेळी त्यांनी शहापूर तालुक्यातील पाणीटंचाईच्या प्रश्नावरही भाष्य करत, विधानसभेचे अधिवेशन संपल्यानंतर शहापूर तालुक्याच्या पाणीप्रश्नावर प्राधान्याने काम करून तो सोडविण्यासाठी आवश्यक त्या स्तरावर पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन दिले.

निवडणुकीत दिलेला शब्द पाळत गावाला समाजमंदिराची भेट दिल्याबद्दल आम्ही खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांचे ऋणी आहोत, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र विशे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) तालुका अध्यक्ष नंदकुमार मोगरे, माजी पंचायत समिती सदस्य शांताराम सासे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) युवा तालुका अध्यक्ष अविनाश साबळे, ओबीसी महासंघाचे प्रकाश भांगरथ, कुणबी समाज संघाचे संचालक पांडुरंग खापरे, सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ दिनकर, प्रभारी सरपंच दर्शना घोडविंदे, माजी उपसरपंच निशा वाळिंबे तसेच आल्याणी व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र सापळे यांनी केले. यावेळी जानू निमसे, महादेव निमसे, केशव निमसे, मुकुंद निमसे, पोलीस पाटील हेमंत निमसे, आत्माराम सापळे, प्रदीप सापळे, संजय सापळे, वसंत निमसे, दिगंबर निमसे, नितीन निमसे, काळूराम सातपुते, दिलीप मोरे, कैलास गुंड, पुंडलिक खाडे, विष्णू खाडे, निलेश निमसे, भरत निमसे, दत्तात्रय भोईर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुणवत्तापूर्ण विकासकामे, दिलेला शब्द पाळणारे लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांचा उत्स्फ ूर्त सहभाग यामुळे आल्याणीतील सम ाजमंदिर लोकार्पण सोहळा संस्मरणीय ठरला. खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांनी दर्जेदार विकासकामांवर भर देत शहापूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली.

# पाटणच्या समाज सेवा संघाच्या अध्यक्षपदी लक्ष्मण चव्हाण, उपाध्यक्षपदी सागर मोरे


उपाध्यक्ष- सागर मोरे | अध्यक्ष- लक्ष्मण चव्हाण

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०१, पाटण (सातारा) :** पाटण शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक जडणघडणीत गेली अनेक दशके अग्रेसर असलेल्या आणि सर्वात जुन्या व प्रतिष्ठित समाज सेवा संघ, मोरे गल्ली गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी युवा नेतृत्व लक्ष्मण चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी युवा व उत्साही कार्यकर्ते सागर मोरे आणि खजिनदारपदी अनुभवी संजय मोरे यांची फ ेरनिवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर संपूर्ण पाटण शहरातून आणि सर्व स्तरातून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. समाज सेवा संघ म्हणजे केवळ एक गणेशोत्सव मंडळ नव्हे, तर पाटणच्या सामाजिक एकतेचा आत्मा आहे. ज्या काळात गणेशोत्सवाला केवळ उत्सव म्हणून पाहिले जाते, त्या काळात या मंडळाने लोकाभिमुख, समाजप्रबोधनात्मक आणि डोळ्यात अंजन घालणारे देखावे सादर करून एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. या मंडळाच्या देखाव्यांची दखल केवळ पाटण तालुक्यातच नव्हे, तर संपूर्ण राज्यपातळीवर घेण्यात आली असून, मंडळाला राज्यस्तरीय पारितोषिकांसह अनेक शासकीय आणि निमशासकीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. ही परंपरा केवळ देखाव्यांपुरती मर्यादित नसून, रक्तदान शिबिर, शैक्षणिक मदत, आणि सामाजिक उपक्रमांद्वारेही मंडळ नेहमीच अग्रेसर राहिले आहे.

नवनिर्वाचित अध्यक्ष लक्ष्मण चव्हाण यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, मंडळाने माझ्यावर टाकलेला विश्वास मी सार्थ ठरवीन. आमच्या मंडळाची लोकप्रबोधनाची आणि सामाजिक बांधिलकीची परंपरा आहे, ती याही वर्षी अधिक जोमाने कायम ठेवली जाईल. चालू वर्षी ही प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवेल असा भव्य–दिव्य आणि समाजाला दिशा देणारा देखावा सादर करण्यात येईल. या निवड प्रक्रियेच्या वेळी मंडळाचे जेष्ठ मार्गदर्शक आणि माजी अध्यक्ष गणेश मोरे, चंद्रकांत मोरे, चंद्रहार निकम, समीर सय्यद, सुरेश (दाजी) संकपाळ, राजेंद्र देसाई, नितीन पवार, आनंदराव देसाई, खाशाबा चव्हाण, सुरेश संकपाळ, बाळासाहेब देसाई, महेंद्र चव्हाण, पंडीतराव मोरे, बापूराव मोरे, राजेंद्र मोरे, पराग चव्हाण, भाऊ तांबे, आनंदराव गुरव, तानाजी गुरव, कुमार साळुंखे, मकरंद गुरव, भूषण मोरे, चंद्रकांत साळुंखे, इंद्रजित मोरे, प्रदीप साळुंखे, राजेंद्र कोळी, उमेश मोरे, अक्षय देसाई, धिरज लुगडे, दिपक गुरव, सुरज लुगडे, दत्तात्रय मोरे, प्रताप मोरे, पिंटू कोळी, विजय मोरे, राजू आर्डे, आदित्य मोरे, सनी मोरे, महेश मोरे, अजय निकम, भानुदास आर्डे, शिवराज गुरव आदी सर्व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांनीच नूतन कार्यकारिणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या निवडीमुळे मोरे गल्ली परिसरात उत्साहाचे वातावरण असून, यंदाचा गणेशोत्सव अधिकच दिमाखदार होणार असल्याची चर्चा पाटण शहरात रंगली आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवारांकडून पारनेर–नगरच्या विकास कामांचा आढावा



**अक्षराज : वसंत रांधवन**

**दि.०१, अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या अहिल्यानगर दौऱ्यादरम्यान पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे. पारनेर–नगरचे कार्यसम्राट आमदार काशिनाथ दाते यांनी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड यांच्यासह उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत मतदारसंघातील राजकीय, सामाजिक परिस्थितीवर आणि विविध विकासकामांवर सविस्तर चर्चा झाली.

आमदार काशिनाथ दाते यांनी मतदारसंघातील प्रगतीचा संपूर्ण आराखडा उपमुख्यमंत्र्यांसमोर मांडला. म तदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या मुद्द्यांवर सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाली.

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी स्थानिक राजकीय घडामोडी, सामाजिक वातावरण, संघटनात्मक स्थिती आणि नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेतल्या. स्थानिक प्रश्न सोडवून विकासाला गती देण्यासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत याची माहिती घेतली. यावेळी त्यांनी पारनेर–नगरच्या विकासासाठी राज्य शासनामार्फत सर्वतोपरी सहकार्य करण्याची ठाम ग्वाही दिली. राज्य शासनाकडून आतापर्यंत मिळालेल्या सहकार्याबद्दल आम दार काशिनाथ दाते यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे आभार मानले. शासनाच्या बळावर पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड म्हणाले, या भेटीमुळे पारनेर–नगर मतदारसंघातील प्रलंबित विकासकाम ांना अधिक गती मिळेल. शासनाच्या सहकार्याने आ. दाते सरांच्या नेतृत्वात मतदारसंघाच्या विकासाला निश्चितच नवसंजीवनी मिळेल.

## थोडक्यात बातम्या

# दिवा प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक दीपक जाधव यांची बिनविरोध निवड



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०१, दिवा (ठाणे) :** ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी प्रभाग क्र. २८ चे नगरसेवक दीपक जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने अध्यक्षपदाची निवड निश्चित मानली जात होती. दिवा प्रभाग समितीमध्ये शिवसेना आणि भाजप युतीचे एकूण ११ नगरसेवक असल्याने संख्याबळाच्या जोरावर दीपक जाधव यांची अध्यक्षपदी निवड होणे निश्चित होते. अखेर त्यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब झाले. दीपक जाधव यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना शिवसेना पक्षाचे प्रमुख स्थानिक नेते तसेच दिवा शहरप्रमुख व नगरसेवक रमाकांत मढवी, शैलेश पाटील, बाबाजी पाटील, आदेश भगत, नगरसेविका साक्षी मढवी, अर्चना पाटील, स्नेहा पाटील, दिपाली भगत, दर्शना म्हात्रे यांच्यासह शिवसेनेचे ज्येष्ठ नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

दिवा प्रभाग समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आता दीपक जाधव यांच्या खांद्यावर आली असून, त्यांच्या निवडीचे शिवसेना–भाजप युतीच्या कार्यकर्त्यांकडून स्वागत करण्यात येत आहे. नवीन अध्यक्ष दीपक जाधव म्हणाले, दिवा परिसरातील रस्ते, पाणी, स्वच्छता आणि विकास कामांना प्राधान्य देऊन नागरिकांच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करेन.

# बोरी पोलिसांचा स्तुत्य उपक्रम; अपघातप्रवण ठिकाणी स्वखर्चातून रिफ्लेक्टर स्टिकर्स बसविले



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०१, परभणी :** रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करून वाहनचालकांचा प्रवास सुरक्षित व्हावा, या उद्देशाने बोरी पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. बोरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.धोंडगे, पोलीस उपनिरीक्षक थोरवे, पोलीस उपनिरीक्षक गायकवाड तसेच त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांनी स्वखर्चातून पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अपघातप्रवण ठिकाणे, धोकादायक वळणे, पूल आणि कमी दृश्यमानता असलेल्या रस्त्यांवर परावर्तित (रिफ्लेक्टर) पिवळे, लाल व पांढरे स्टिकर्स लावले.रात्रीच्या वेळी वाहनचालकांना धोकादायक ठिकाणे स्पष्ट दिसावीत आणि संभाव्य अपघात टाळता यावेत, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे. विशेष म्हणजे, बोरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत प्रथमच अशा प्रकारचा लोकहिताचा उपक्रम राबविण्यात आला आहे.

काही दिवसांपूर्वी पिंपरी फाटा येथे झालेल्या भीषण अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतर अपघात रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत होती. त्याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी स्वतः पुढाकार घेत स्वखर्चातून रिफ्लेक्टर स्टिकर्स बसविल्याने नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत होत आहे. ग्रामीण व शहरी भागातील नागरिक, शेतकरी आणि वाहनचालकांनी बोरी पोलीस स्टेशनच्या संपूर्ण पथकाचे मनापासून कौतुक केले असून, परभणी जिल्ह्यातील इतर पोलीस ठाणे व संबंधित प्रशासनानेही अशा प्रकारचे उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शिरवंजे येथे आदिवासी सहकारी संस्थेचा वृक्षारोपण उपक्रम



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०१, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील शिरवंजे येथे शिरवंजे मच्छीमार व्यवसायिक आदिवासी सहकारी संस्थेमार्फत पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. गावाच्या मुख्य रस्त्यालगत दोन्ही बाजूंना विविध प्रकारच्या झाडांची रोपे लावण्यात आली, ज्यामुळे परिसर हिरवागार होण्यास मोठी मदत होणार आहे. या उपक्रमामुळे केवळ पर्यावरण संरक्षणालाच चालना मिळाली नाही, तर गावकऱ्यांमध्ये वृक्षसंवर्धनाबाबत जागरूकताही निर्माण झाली. आज लावलेले हे रोप उद्याचा आधार या भावनेतून सर्वांनी सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला. या कार्यक्रम ाला संस्थेचे अध्यक्ष हरिचंद्र फर्डे, सचिव विलास फर्डे, माजी सरपंच यशवंत फर्डे, पोलीस पाटील काळूराम फर्डे, पत्रकार सुनील फर्डे, सदस्य सुरेश फर्डे, सदस्य कालूराम फर्डे, कुणाल माळी, शिवाजी माळी, बंटी फर्डे, कामिनी फर्डे यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावाच्या विकासासोबतच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# गुडसूर येथे चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत यश; विद्यार्थ्यांचे अभिनंदन

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०१, उदगीर (लातूर) :** उदगीर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत.जि प कन्या प्रशाला गुरसुर येथील विद्यार्थी :-

१) मसीरा मगदूम शेख – २१२ २) जाधव रामेश्वर गजानन – २००
३) कृष्णाली ज्ञानोबा – १७६. ४) शारवाले अल्तमश हुसेन – १७६
५) सुल्लाळे दिव्या दीपक – १७० ६) आयशा अब्दुल शेख – १६६
७) अल्फिया अमीन तो – १६४. ८)नौमान अमीन खुरेशी – १५४.
९) मयुरी ज्ञानोबा पिंगळे – १५२ गुडसूर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मु अ.श्री.यंगाले, श्री मुंडे व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने हार्दिक हार्दिक अभिनंदन करण्यात आले.